महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे | Rs.2/- | कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

शुक्रवार ■ ०६ जून २०२५ ■ वर्ष - सहावे ■ अंक ३३८ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पत्रकार हवे आहेत

दैंनिक ठाणे जीवनदीप वार्ता करिता खालील ठिकाणी पत्रकार नियुक्त करणे आहे. इच्छुकांनी संपर्क करावा

• मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर • बोईसर • वसई • विरार • भाईंदर • पनवेल • वाडा • बदलापूर • शहापूर • आसनगाव • भिवंडी • कसारा • कर्जत • सरळगाव • म्हसा • धसई • अंबरनाथ • विठ्ठलवाडी • उल्हासनगर • टिटवाळा • शहाड • कोनगाव • आंबिवली • दिवा • कळवा

दैनिक 'ठाणे जीवनदीप वार्ता'
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.)
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९०८२६ ६४७८१
E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com


# समृद्धी महामार्गाच्या आमणे - इगतपुरी अंतिम टप्प्याचे लोकार्पण



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नागपूर** - मुंबई समृद्धी महामार्गातील इगतपुरी ते आमणे या ७६ किमी लांबीच्या चौथ्या व शेवटच्या टप्प्याचे लोकार्पण आज (गुरुवार, ५ जून) रोजी पार पडले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या महामार्गाचं लोकार्पण झालं. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, कॅबिनेटमधील इतर मंत्री व अधिकारी उपस्थित होते. इगतपुरी येथील बोगद्यातील उत्तरेकडील मार्गिकवर लोकार्पणाचा मोठा सोहळा पार पडला. लोकार्पणाआधी मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी कारने या बोगद्यातून प्रवास केला.

समृद्धी महामार्गाच्या शेवटच्या टप्प्याचे लोकार्पण झाल्याने संपूर्ण ७०१ किमी लांबीचा रस्ता वाहतूक सेवेत दाखल झाला आहे. त्यामुळे आता नागपूर मुंबई प्रवास १६ तासांऐवजी आठ तासांत पूर्ण करता येणार आहे. दरम्यान, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या (एमएसआरडीसी) ठाणे खाडी पूल-३ प्रकल्पातील दक्षिणेकडील अर्थात पुण्याहून मुंबईकडे जाणाऱ्या मार्गिकचे लोकार्पणही पार पडले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे या मार्गिकचं लोकार्पण केलं. या मार्गामुळे पुणे-मुंबई प्रवास अधिक सुकर होणार आहे.



महामार्ग अपघातमुक्त करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. या महामार्गामुळे वन्यजीवांच्या संचारात अडथळे येऊ नयेत म्हणून 100 प्रकारच्या संरचना तयार करण्यात आल्या आहेत. देशात अशा प्रकारची रचना प्रथमच साकारण्यात आली आहे. त्यामुळे वन्य प्राण्यांचा संचार विना व्यत्यय सुरू आहे, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले. आगामी काळात शक्तिपीठ महामार्ग साकारण्यात येणार आहे. या महामार्गामुळे मराठवाड्यातील आर्थिक चित्र बदलण्यास मदत होईल - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## असा आहे समृद्धी महामार्ग

१. समृद्धी महामार्गासाठी एकूण खर्च ६१ हजार कोटी
२. एकूण लांबी ७०१ किमी
३. वन्यजीवांच्या मुक्त संचारासाठी एकूण १०० प्रकारच्या विशिष्ट संरचनांची उभारणी, त्यात डोंगर-दऱ्यांमधल्या ७३ व्हायाडक्टचा समावेश.
४. देशात पहिल्यांदाच वाहनांसाठी ८ ओव्हरपास आणि ९२ अंडरपास
५. समृद्धी महामार्गावर ३२ मुख्य पूल तर ३१७ लहान पूल
६. एकूण ५९ ओव्हरपास आणि २२९ अंडरपास
७. देशातला आत्तापर्यंतचा सर्वात रुंद बोगदा इगतपुरीचा
८. समृद्धी महामार्गावर पादचाऱ्यांसाठी १८० ओव्हरपास व २२४ अंडरपास
९. उत्तम अभियांत्रिकीचे नमुने ठरतील असे एकूण २५ इंटरचेंज
१०. २०२२ मध्ये ११ डिसेंबरला पहिला टप्पा, २०२३ मध्ये २६मे रोजी दुसरा टप्पा, २०२४ मध्ये ४ मार्चला तिसरा टप्पा तर २०२५ मध्ये ५ जूनला चौथा व शेवटच्या टप्प्याचं लोकार्पण
११. आज उद्घाटन झालेला शेवटचा टप्पा ७६ किलोमीटरचा
१२. शेवटच्या टप्प्यात ५ जुळे बोगदे, त्यांची एकूण लांबी ११ किलोमीटर
१३. १०० टक्के आगविरोधी यंत्रणा. बोगद्यातील तापमान ६० अंशांवर गेल्यास स्वयंचलित पाण्याची फवारणी सुरू होईल. तापमान ३० अंशांपर्यंत खाली आल्यावर ही यंत्रणा बंद होईल.
१४. शेवटच्या टप्प्यात इगतपुरी, फूडघर आणि आमणे हे तीन प्रमुख इंटरचेंज
१५. अपघात झाल्यास बचावासाठी जोडबोगदे
१६. १२ कोटी सिमेंटची पोती, ७ लाख मेट्रिक टन स्टील आणि १३ कोटी घनमीटर भराव, ८ कोटी घनमीटर खोदकाम झालं. त्यातला ६ कोटी घनमीटर माल पुन्हा वापरण्यात आलेला आहे.

### मुंबईतून कसे पोहोचाल समृद्धी महामार्गापर्यंत?

प्रत्यक्ष समृद्धी महामार्ग आमणेजवळील आटगाव इंटरचेंजपासून सुरू होतो. शहापूरजवळील आटगाव इंटरचेंजचं मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसपासून अंतर जवळपास ८० ते ९० किलोमीटर आहे. त्यामुळे प्रत्यक्ष मुंबईतून शहापूर आटगाव येथील समृद्धी महामार्गावरील पहिल्या इंटरचेंजपर्यंत पोहोचण्यासाठी अंदाजे दोन ते अडीच तास लागण्याची शक्यता आहे. मुंबईहून आटगाव इंटरचेंजपर्यंत पोहोचण्यासाठी ठाणे मार्गेच जावं लागेल.

थोडक्यात महत्वाचे

## किरीट सोमय्या यांची पडघा, बोरीवली ग्रामपंचायतींना भेट



दै. ठाणे जीवनदीप वार्ता ■ राजेश दळवी

**पडघा दि. ५ :** भिवंडी तालुक्यातील पडघा व दहशतवादी, देशविरोधी कारवायासाठी सध्या चर्चेत असलेल्या बोरीवली ग्रामपंचायतीची बोगस जन्म, दाखल्याबाबत भाजपा नेते किरीट सोमय्या यांनी चौकशी केल्याने ग्रामपंचायत प्रशासनात खळबळ उडाली आहे. भाजपा नेते व माजी खासदार किरीट सोमय्या हे गुरूवारी भिवंडी तालुक्यात दौऱ्यावर आले होते. यावेळी पडघा येथे आगमन होताच भाजपच्या वतीने त्यांचे जोरदार स्वागत करण्यात आले. त्यानंतर त्यांनी पडघा व बोरीवली ग्रामपंचायत मध्ये जाऊन नोंदी नसलेल्या जन्म मृत्यू दाखल्याची चौकशी केली.व नोंदी नसलेल्या जन्म दाखल्यांची ग्रामपंचायतीने कसुन चौकशी करून दाखला देण्याची मागणी त्यांनी केली यावेळी पत्रकारांनी सोमय्या यांना छेडले असता चार महिन्यांत महाराष्ट्रात मोठा घोटाळा झाला असुन २०२४ मध्ये २ लाख २४ हजार अपात्र लोकांनी खोटे कागदपत्रे सादर करून जन्म नोंदी घेतल्या असुन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चौकशीचे आदेश दिलेले आहेत. त्याबाबत पडघा परिसरातील अर्धा डझन गावाची माहीती मला मिळालेली असुन म्हणून फिरून चौकशी करीत असल्याचे त्यांनी सांगितले तसेच मालेगाव येथे १०४४ जन्म प्रमाणपत्रे नागरीकांनी नेली असुन ती सर्व बोगस असुन त्यातील २१७ गायब आहेत. हे प्रकार भयानक असुन या जन्म प्रमाणपत्रे घोटाळ्यामुळे राज्य व देशाची आंतरिक सुरक्षा धोक्यात आली असुन त्यांची चौकशी सुरू आहे तसेच बोगस जन्म प्रमाणपत्रे नेले की लगेच पासपोर्ट मिळऊन फॉरेनला रवाना असे भयानक प्रकार घडत असल्याने बोगस जन्म दाखल्यांची फिरून चौकशी करत असल्याचे किरीट सोमय्या यांनी सांगितले. त्यानंतर ते अंबाडी कुडुस ग्रामपंचायतीकडे रवाना झाले. यावेळी भिवंडी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी गोंविद खामकर पडघा ग्रामपंचायतीचे सरपंच रविंद्र विशे बोरीवली सरपंच अन्वर पिंजारी ग्रामपंचायत अधीकारी भास्कर घुडे, आर. जे. म्हसकर भाजपा जिल्हाध्यक्ष जितेंद्र डाकी, पडघा शहर अध्यक्ष उमेश शेरेकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती दत्तात्रेय पाटोळे, पंचायत समिती माजी सभापती अशोक शेरेकर, दिनेश गंधे, अविनाश पातकर, अभिषेक नागावेकर सह भाजपा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ठाण्यातील विकासकामे १५ ऑगस्टपर्यंत पूर्ण करा - परिवहन मंत्र्यांचे आदेश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



**ठाणे :** ठाणे महापालिका क्षेत्रातील ओवळा-माजिवडा विधानसभा मतदारसंघात विविध निधीतून पायाभूत सुविधांची विकासकामे सुरू असून त्यांचे उदघाटन करण्यासाठी ही सर्वच कामे १५ ऑगस्टपर्यंत पुर्ण करण्याच्या दृष्टीने सर्व यंत्रणांनी नियोजन करावे, असे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी गुरुवारी दिले.

ठाणे महापालिका मुख्यालयातील कै. अरविंद पेंडसे सभागृहात मंत्री प्रताप सरनाईक यांनी गुरुवारी ठाणे महापालिका, एमएमआरडीए, सार्वजनिक बांधकाम विभागाची बैठक घेतली. यात ठाणे महापालिका क्षेत्रातील विविध विकास कामे आणि शासनाकडील मंजूर निधी खर्च करणे, एमएमआरडीएच्या माध्यमातून होणाऱ्या रस्त्यांचा आढावा घेणे आणि घोडबंदर येथील रस्त्यांची कामे याचा आढावा त्यांनी घेतला. या बैठकीस, महापालिका आयुक्त सौरभ राव, अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी, नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा, सहाय्यक संचालक नगररचना संग्राम कानडे, एमएमआरडीएचे संचालक (प्रकल्प) अनिल साळुंखे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंता सिद्धार्थ तांबे, मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरणाचे अधिक्षक अभियंता विनय सुर्वे यांच्यासह महापालिका, एमएमआरडीए, सार्वजनिक बांधकाम विभाग आदी विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



## अंबरनाथ तालुका क्रीडा संकुलाचा होणार कायापालट

### २५ कोटींच्या खर्चातून होणार पुनर्बांधणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर :** बदलापुरात असलेल्या तालुका क्रीडा संकुलाच्या पुनर्बांधणीचा मार्ग मोकळा झाला आहे. मंत्रालयात पार पडलेल्या संयुक्त बैठकीत या क्रीडा संकुलाच्या पुनर्बांधणीसाठी २५ कोटींचा प्रस्ताव सादर करण्यात आला. नव्याने उभारण्यात येणाऱ्या क्रीडा संकुलात बॅडमिंटन कोर्ट, धावपट्टी, टेनिस कोर्ट, जलतरण तलाव यांच्यासह प्रेक्षकांसाठी आसन व्यवस्थाही असणार आहे. जून २०२३ मध्ये या क्रीडा संकुलाची पडझड झाली होती. भितींसह संपूर्ण छत कोसळल्याने येथे खेळाडूंना सराव करता येत नव्हता.

एकीकडे अंबरनाथ सारख्या शहरात आंतरराष्ट्रीय दर्जाचे शुटीं रेंज असताना आणि त्यातून राष्ट्रीय पातळीवर खेळणारे विद्यार्थी तयार होत असताना दोन्ही शहरातील क्रीडा संकुलांचा विकास मात्र रखडला आहे. अंबरनाथ पालिकेच्या क्रीडा संकुलाचे कामही पूर्ण झालेले नाही. त्यामुळे बदलापूर शहरात असलेल्या अंबरनाथ तालुक्या क्रीडा संकुल हा खेळाडूंसाठी एकमेव पर्याय होता. मात्र जून २०२३ मध्ये पावसात या क्रीडा संकुलाची भिंत कोसळली होती. भिंत कोसळल्यानंतर त्याचे छप्परही जमिनदोस्त झाले होते. या घटनेत क्रीडा संकुलाचे मोठे नुकसान झाले. तसेच खेळाडूंचा येथील खेळही बंद झाला. विशेष म्हणजे काही वर्षांपूर्वीच याची उभारणी करण्यात आली होती. सुदैवाने क्रीडा संकूल बंद असताना भींत कोसळली.

## भातसा, घोरपडी पुलावर जीवघेणे खड्डे

### नागरिकांचा जीव मुठीत घेऊन प्रवास

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ●राजेश जागरे**

शहापुर-किन्हवली मार्गावरील सापगाव जवळील भातसा नदीवरील पुलाचे कठडे तुटले आहेत तर गोठेघर गावहद्दीतील घोरपडी नदीवरील पुल जीर्ण झाल्याने वाहतुकीसाठी धोकादायक बनला आहे.तसेच या ठिकाणी दोन फुटी खड्डे तयार झाल्याने वाहन चालवायचे कसे असा प्रश्न वाहन चालकांना पडला आहे. तथापि या मार्गावरुन कर्जत, मुरबाड, अहमदनगर, जे.एन.पीटी या सारख्या



औद्योगिक वसाहतीमध्ये अवजड वाहनांसह शहापूर तालुक्याच्या ग्रामीण भागातील दररोज हजारो प्रवासी या-ना त्या वाहनाने प्रवास करत असतात.या दोन्ही पुलांची अवस्था बिकट झाली असून याठिकाणी कधीही मोठा अनर्थ घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

शहापूर तालुक्यातील घोरपडी नदीवरील पुल ब्रिटिशकालीन असुन जीर्ण व कमकुवत झाला आहे.पुल अंरूद असुन पुलाच्या दोन्ही बाजूस संरक्षण कठडे नसल्यामुळे व मोठे खड्डे पडले असल्याने इथे सतत वाहन चालकांना ट्रॉफिकचा सामना करावा लागत आहे.मागील तीन महिन्यापूर्वी एक रिक्षा प्रवासी घेऊन पुलाच्या खाली कोसळली होती. सुदैवाने कोणतीही दुर्घटना घडून जीवीतहानी झाली नाही.अशा अनेक छोट्या-मोठ्या घटना येथे घडत असतात.तर सापगांव जवळील भातसा नदीवरील पुलाचे संरक्षक कठडे पडले असतांना सुद्धा महाराष्ट्र राज्य रस्ते विकास विभागाचे अधिकारी याकडे दुर्लक्ष करीत असुन सावित्री पुलासारखी एखादी मोठी दुर्घटना होण्याची वाट पाहत आहेत का अशी चर्चा प्रवाशी व वाहनचालक करत आहेत.दरम्यान याबाबत संबधित एम.एस.आर.डी सीचे श्री.शेख यांच्याशी संपर्क साधला असता सदर रस्ता सुस्थितीत बनवयाच्या सूचना ठेकेदार कंपनीला दिल्या असल्याचे त्यांनी सांगितले.









# गीतासार



**अध्याय १३**
**क्षेत्रक्षेत्रज्ञविभागयोगः**

महाभूतान्यहङ्कारो बुद्धिरव्यक्तमेव च । इन्द्रियाणि दशैकं च पञ्च चेन्द्रियगोचराः ॥ १३-५ ॥

पाच महाभूते, अहंकार, बुद्धी आणि मूळ प्रकृती तसेच दहा इंद्रिये, एक मन आणि पाच इंद्रियांचे विषय अर्थात शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध ॥ १३-५ ॥

इच्छा द्वेषः सुखं दुःखं सङ्घातश्चेतना धृतिः । एतत्क्षेत्रं समासेन सविकारमुदाहृतम् ॥ १३-६ ॥

तसेच इच्छा, द्वेष, सुख, दुःख, स्थूल देहाचा पिंड, चेतना आणि धृती अशा प्रकारे विकारांसहित हे क्षेत्र थोडक्यात सांगितले गेले आहे. ॥ १३-६ ॥

अमानित्वमदम्भित्वमहिंसा क्षान्तिरार्जवम् । आचार्योपासनं शौचं स्थैर्यमात्मविनिग्रहः ॥ १३-७ ॥

मोठेपणाचा अभिमान नसणे, ढोंग न करणे, कोणत्याही सजीवाला कोणत्याही प्रकारे त्रास न देणे, क्षमा करणे, मन, वाणी इत्यादींबाबत सरळपणा, श्रद्धा व भक्तीसह गुरूंची सेवा, अंतर्बाह्य शुद्धी, अंतःकरणाची स्थिरता आणि मन व इंद्रियांसह शरीराचा निग्रह ॥ १३-७ ॥

इन्द्रियार्थेषु वैराग्य मनहङ्कार एव च । जन्म मृत्यु जराव्याधि दुःखदोषा नुदर्शनम् ॥ १३-८ ॥

इह व पर लोकांतील सर्व विषयांच्या उपभोगाविषयी आसक्ती नसणे आणि अहंकारही नसणे, जन्म, मृत्यू, वृद्धत्व आणि रोग इत्यादींमध्ये दुःख व दोषांचा वारंवार विचार करणे ॥ १३-८ ॥

# वाढीव कचरा शुल्क प्रकरणी मनसेचा केडीएमसीवर जनआक्रोश मोर्चा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



कल्याण : कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने घनकचऱ्यावरील वाढीव कर रद्द करावा या मागणीसाठी मनसेच्या वतीने केडीएमसी मुख्यालयावर गुरूवारी जन आक्रोश मोर्चा काढण्यात आला.

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतील घनकचरा व्यवस्थापन विभागाने कुठलीही पूर्वसूचना न देता नागरिकांच्या माथी वाढीव कर मारला आहे. घरगुती कचरा उचलण्यासाठी आधी ६०० रुपये घेतले जात होते. यामध्ये ३०० रुपयांनी वाढ करून ९०० रुपये करण्यात आले आहेत. तसेच व्यवसायिक आस्थापनांसाठी आधी ७२० रुपये घेतले जात होते. यामध्ये ७०० रुपयांनी वाढ करून १४२० रुपये इतका केला आहे. नागरिकांना कुठल्याही प्रकारची सूचना न देता परस्पर कर वाढ करून नागरिकांची लूटमार केली जात आहे.

याबाबत महाराष्ट्र नवनिर्माण सेने मार्फत तीव्र "जनआक्रोश मोर्चा" महापालिकेच्या विरोधात काढण्यात येईल अशा आशायाचे पत्र मनसेच्या वतीने केडीएमसी आयुक्तांना 23 मे 2025 रोजी देण्यात आले होते. तरी प्रशासनाने दखल न घेतल्याने मनसेच्या वतीने आज कल्याण पश्चिमेतील मोहिंदर काबल सिंग शाळे पासून केडीएमसी मुख्यालयावर धडक आक्रोश मोर्चा मनसेचे ठाणे जिल्हा अध्यक्ष अविनाश जाधव यांच्या नेतृत्वाखाली काढीत आयुक्तांची भेट घेतली. यावेळी मनसेचे माजी आमदार प्रकाश भोईर, जिल्हाध्यक्ष उल्हास भोईर यांच्यासह मनसेचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोर्चात सहभागी झाले होते.

या वाढीव घनकचर्यावरील दरवाढ कमी करण्यासाठी 15 जूनचा अल्टीमेंटम देत मनसे पक्ष प्रमुख राज ठाकरे यांच्या दौऱ्यापूर्वी मागणी मान्य करावी अन्यथा मनसे स्टाईलने उत्तर दिले जाईल. तसेच पूर्वीच्या साफसफाई ठेकेदाराला प्रतिमाह 3 कोटी देण्यात येत होते. आता नवीन नियुक्त केलेल्या सुमित एल्को कंपनीस 9 कोटी प्रतिमाह हे गणित कसे, ज्या ठेकेदाराला बीएमसीने काळ्या यादीत टाकले आहे. त्याला काम दिले जाते. कोणच्या सांगण्यावरून, घनकचरा व्यवस्थापन उप आयुक्त यांची बदली म्हणजे रिंगचा भाग आहे. तसेच या ठेकेदाराने पहिले शहराची साफसफाई व्यवस्थित करावी, प्रशासनाने जनतेला स्मार्ट सिटीची दिव्या स्वप्न दाखवू नयेत. प्रत्यक्ष कृती करावी असे प्रसिद्धी माध्यमांना कल्याण जिल्हा अध्यक्ष मनसे उल्हास भोईर यांनी सांगितले.

दरम्यान शिवसेना ठाकरे गट आणि मनसे युतीवर मनसे नेते अविनाश जाधव यांना विचारले असता, उद्धव साहेबांकडे राज साहेबांचा नंबर आहे, फक्त एक फोन करावा आम्ही तयार आहोत. मराठी माणसासाठी आणि महाराष्ट्रासाठी आम्ही कोणतेही पाऊल उचलायला तयार आहोत. अशी प्रतिक्रिया प्रसिद्धी माध्यामांनी विचारलेल्या शिवसेना उबाठा मनसे युती प्रश्नावर दिली.

# अंधश्रद्धा निर्मूलनासाठी महिलांनी पुढाकार घेणे गरजेचे - प्रा. मनीषा राजपूत

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



ठाणे : अंधश्रद्धा निर्मूलनासाठी महिलांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे. समाजाच्या जडणघडणीत महिलांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून महिलांनी एकत्र येऊन विवेकवादी विचारांची गंगा घराघरात पोहोचवली पाहिजे असे प्रतिपादन लेखिका प्रा. मनीषा राजेंद्र राजपूत यांनी केले. ठाण्यात झालेल्या शिवधर्म या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यात पुस्तकाबद्दलची भूमिका मांडताना त्या बोलत होत्या.

शारदा प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या या पुस्तक प्रकाशन सोहळ्यात अध्यक्षस्थानी मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष मंगेश शंकर आवळे तर प्रमुख पाहुणे म्हणून ठाण्यातील प्रसिद्ध उद्योजक राजेश सोलंकी तसेच एमएच हायस्कूल आणि ज्युनिअर कॉलेजचे माजी प्राचार्य आर जे राजपूत, प्राचार्य राजेंद्र वेखंडे, लेखक बाळ कांदळकर हे उपस्थित होते.

प्राध्यापक मनीषा राजपूत यांनी आपल्या भाषणात शिवधर्म या पुस्तका मागील प्रेरणा, त्यातील ऐतिहासिक आणि सामाजिक संदर्भ स्पष्ट करताना समाजामध्ये अंधश्रद्धा, रूढी आणि परंपरांच्या आड येणाऱ्या विवेकाचा अभाव दूर करण्यासाठी स्त्रियांनी अधिक सक्रिय भूमिका बजावण्याचे आवाहन केले. घर ही परिवर्तनाची पहिली शाळा आहे. आणि त्या शाळेची शिक्षिका म्हणजे श्री, असे म्हणत त्यांनी उपस्थित महिलांना जागरूक आणि सामाजिक दृष्ट्या जबाबदार नागरिक बनण्याचे आवाहन केले.

यावेळी बोलताना लेखक बाळ कांदळकर म्हणाले अंधश्रद्धा निर्मूलनाचे विधायक कार्य लेखिका मनीषा राजपूत आपल्या लेखनातून करीत आहेत. अंधश्रद्धेच्या विरोधात उभे राहण्यासाठी छातीवर गोळ्या खाण्याची तयारी ठेवावी लागते. लेखिकेला जे बाळकडू मिळाले ते समाज उन्नतीचे होते. त्यामुळे शिवधर्म हे पुस्तक पुढील अनेक पिढ्यांना मार्गदर्शक ठरेल. प्रकाशक प्राध्यापक डॉक्टर संतोष राणे यांनी प्रास्तविकात शिवधर्म या ग्रंथाची गरज, त्यातील विचारसरणी आणि लेखिकेच्या कार्याबद्दल गौरवोद्गार काढले. कार्यक्रमाचे संयोजन आणि स्वागत राजपूत परिवाराच्या सदस्यांनी केले. याप्रसंगी ठाणेतील अनेक साहित्यप्रेमी, समाजसेवक, शिक्षक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सूत्रसंचालन डॉक्टर अंजली जाधव, मधुबाला राजपूत यांनी केले. मुख्याध्यापक राजेंद्र यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त
# गिरगाव चौपाटीवर स्वच्छता मोहिम

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांच्या उपस्थितीत गिरगाव चौपाटी येथे एकल प्लास्टिक निर्मूलन मोहीम राबविण्यात आली. वसुंधरेच्या संरक्षणासाठी पर्यावरण विभागाने पाऊले उचलली असून नागरिकांनी एकल वापराच्या प्लास्टिकचा वापर टाळण्याचे आवाहन मंत्री श्रीमती मुंडे यांनी यावेळी केले.

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, बृहन्मुंबई महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने गिरगाव चौपाटी येथे एकल प्लास्टिक निर्मूलन मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम, सदस्य सचिव डॉ. अविनाश ढाकणे यांच्यासह विविध महाविद्यालयांचे विद्यार्थी, महापालिकेचे स्वच्छता कर्मचारी व सामान्य नागरिक उपस्थित होते.

यावेळी मंत्री श्रीमती मुंडे व श्री. कदम यांनी गिरगाव चौपाटीची पाहणी करून या ठिकाणी कशा प्रकारे स्वच्छता केली जाते याची माहिती घेतली. तसेच त्यांनी स्वच्छता कर्मचाऱ्यांबरोबर स्वच्छताही केली. मंत्री श्रीमती मुंडे म्हणाल्या की, पर्यावरण व वातावरणीय बदल आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्यावतीने राज्यात 22 मे पासून एकल वापर प्लास्टिक मुक्तीसाठी मोहीम राबविण्यात येत आहे. एकल वापर प्लास्टिकला नाही म्हणायचे असून त्याचा वापर पूर्णपणे बंद करायचे आहे. त्या प्लास्टिकचा पुनर्वापर कसा करायचा, यासाठी प्रयत्न सुरू आहेत. यासाठी विविध ट्रस्टचा सहभाग घेत आहोत. विविध धार्मिक स्थळ, रुग्णालये, औषधांची दुकाने आदी विविध ठिकाणी प्लास्टिकचा वापर रोखण्यासाठी जनजागृती करत आहोत.

झाडे लावून ती जतन करा, प्लास्टिकचा वापर करणे टाळा, पाण्याची बचत करा, सौरऊर्जा, सायकल वापरणे यासारख्या पर्यावरणपूरक पर्यायांची निवड करा, कापडी पिशव्या वापरा याबाबत जनजागृती करण्यात आली.

कार्यक्रमात विविध संस्थांनी पथनाट्याद्वारे एकल वापराच्या प्लास्टिक बंदीसंदर्भात जनजागृती केली. यावेळी मुक्ताई घनकचरा व्यवस्थापन सेवा संस्था या संस्थेचे सदस्य तसेच जोशी-बेडेकर महाविद्यालयासह विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी एकल वापराच्या प्लास्टिकविरुद्ध घोषवाक्याद्वारे जनजागृती केली व चौपाटीतील कचरा स्वच्छ करून स्वच्छता मोहिमेत सहभागी झाले.

## आईच्या स्मृतिप्रीत्यर्थ
# कणे प्राथमिक शाळेला वॉटरकुलर व इन्व्हर्टर भेट

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



पेण : कै. नंदा कृष्णा पाटील यांच्या प्रथम पुण्यस्मरणाचे औचित्य साधून सुरेंद्र कृष्णा पाटील व त्यांची बहीण सौ.मनीषा सुधीर पाटील यांच्या तर्फे रा.जि.प.शाळा कणे या शाळेसाठी वॉटर कुलर तसेच इनव्हर्टर सेट भेट म्हणून सौ.सुगिता नंदकुमार पाटील सरपंच ग्रामपंचायत कणे यांच्या प्रमुख उपस्थितीत देण्यात आले. ही भेट शाळेतील विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना खूप उपयोगी ठरेल. शाळेसाठी केलेल्या या मदतीबद्दल शाळेचे पदवीधर शिक्षक आदिनाथ पाटील , शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बाळाराम पाटील व सर्व सदस्य तसेच जेष्ठ नागरिक संस्थेचे अध्यक्ष रामदास पाटील यांनी आभार व्यक्त केले.

मुलांच्या आरोग्याच्या दृष्टीकोनातून पाहिले तर हे शाळेतील विद्यार्थ्यांसाठी खूप उपयुक्त ठरेल. या भेटवस्तूमुळे विद्यार्थ्यांना स्वच्छ पाणी तसेच इनव्हर्टर मुळे मुलांना लाईट गेल्यानंतर ही ऑनलाईन शिक्षण तसेच गर्मीच्या दिवसात ही त्याचा फायदा करता येईल, ज्यामुळे त्यांचे शिक्षण अधिक सोपे आणि प्रभावी होईल.सुत्रसंचलन आदिनाथ पाटील गुरुजी यांनी केले.

रा.जि.प. कणे प्राथमिक शाळेला अजूनही अनेक गरजा आहेत आणि त्यांना आशा आहे की, भविष्यातही त्यांना अशाच प्रकारे मदत मिळत राहील.आणि संपूर्ण शाळा डिजिटलं करण्याचं जे त्यांचं स्वप्न आहे ते पूर्ण होतील अशी आशा यावेळी शिक्षकांनी व्यक्त केली.






# उल्हासनगर महावितरण कार्यालयात वंचितने वाचला तक्रारींचा पाढा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



उल्हासनगर : शहरातील महावितरण सेवेकडे संबंधित विभागाचे अक्षम्य दुर्लक्ष होत असून यामुळे वित्त व जीवित हानी घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे संतप्त झालेल्या वंचित बहुजन आघाडी उल्हासनगर शाखेच्या कार्यकर्त्यांनी उल्हासनगर महावितरण विभागाचे कार्यकारी अभियंता यांच्या दालनात अनेक तक्रारींचा पाढा वाचला.

वंचित बहुजन आघाडीच्या शिष्ट मंडळाच्या वतीने देण्यात आलेल्या, या निवेदनद्वारे सम्राट उल्हासनगर शहरातील वीजग्राहकांचे वाढते वीज बील, नवीन डिजिटल मिटर लावू नये, धोकादायक जुने विद्युत खांब बदलणे, अनेक दिवसांपासून विद्युत वाहिनी तारा उघड्या असुन त्या धोकादायक अवस्थेत आहेत. काही ठिकाणी तर विद्युत खांबात करंट आहे. परिणामी, मोठी दुर्घटना अथवा जिवितहानी होण्याची दाट शक्यता आहे. यासाठी त्या धोकादायक जुनी विद्युत खांबे व विद्युत लाईन त्वरित बदलणे, अनियमित वीज खंडीत झाल्याने जेष्ठ नागरिक, लहान मुले, विद्यार्थी यांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते आहे. यासारख्या अनेक समस्यांचा पाढा वंचितच्या पदाधिकाऱ्यांनी महावितरण अधिकाऱ्यां समोर वाचला. या शिष्ट मंडळात शहर सचिव निलेश देवडे, शहर उपाध्यक्ष दिनेश पवार ,वार्ड अध्यक्ष सिद्धार्थ साळवे, ईश्वरभाऊ सोनवणे, उल्हासनगर I.T प्रमुख नितिन भालेराव, वार्ड महासचिव, दिपक चंदनशिव, भारत खैर, दिपक गायकवाड, हर्षल हजारे आणि इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

# धोकादायक भावे सभागृहात कर्मचारी जीव मुठीत घेऊन करतात काम





दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या ह प्रभागक्षेत्र अंतर्गत असलेली भावे सभागृह इमारत धोकादायक आहे. या इमारतीत महाराष्ट शासन महसूल विभागाचे तलाठी कार्यालय आहे. भावे सभागृह इमारत धोकादायक असल्याने येथील कर्मचारी जीव मुठीत धरून कामकाज करीत आहेत. आमचे कार्यालय दुसरीकडे चांगल्या ठिकाणी शिफ्ट करावे अशी मागणी येथील कर्मचारी करीत आहे. याबाबत महाराष्ट्र काँग्रेस प्रदेश सचिव संतोष केणे पालिका आयुक्तांची भेट घेणार आहेत.

कल्याण डोंबिवली महापालिका अंतर्गत हजारोंच्या संख्येने धोकादायक इमारती आहेत. यामध्ये काही शासकीय व पालिकेच्या इमारतींचा समावेश आहे. पालिका आयुक्त कोणतीही दुर्घटना होऊ नये म्हणून खाजगी धोकादायक इमारती रिकाम्या करण्यासाठी तत्पर आहेत. मात्र शासकीय व पालिकेच्या इमारतीबाबत काळजी घेतल्याचे दिसून येत नाही असे महाराष्ट्र काँग्रेस प्रदेश सचिव संतोष केणे सांगतात. केणे यांनी गुरुवारी सकाळी डोंबिवली पश्चिम विभागातील भावे सभागृह इमारतीची पाहणी केली त्यावेळी त्यांना तेथील कर्मचाऱ्यांनी आपले गाऱ्हाणे सांगितले. विशेष म्हणजे या इमारतीत असलेल्या महसूल विभागीय तलाठी कार्यालय अंतर्गत ठाकुर्ली, नवागाव, डोंबिवली, पाथर्ली, आयरे, भोपर, गावदेवी, काटई, संदप, उसरघर, कांचनगांव, कोपर, जुनी डोंबिवली ग्राम महसूल अधिकारी कामकाज करीत आहेत.

येथील अधिकाऱ्यांनी पालिकेच्या ह प्रभागक्षेत्र साहाय्यक आयुक्तांना पत्र पाठवून आम्हाला इतरत्र कोठेही कार्यालय जागा द्या असे पत्र पाठविले आहे. परिणामी या त्यांच्या पत्राला न्याय देऊन धोकादायक भावे सभागृह इमारतीतील कर्मचाऱ्यांना वेळीच दुसरीकडे शिफ्ट करावे असे केणे यांनीही मागणी केली आहे. येथील कर्मचाऱ्यांवर कोणतेही संकट येण्या अगोदर लवकरात लवकर याबाबत व्यवस्था करावी असेही संतोष केणे, राहुल केणे, प्रणव केणे यांनी यावेळी सांगितले.






## रेसिपी
# रव्याचा केक



साहित्य : दीड वाटी रवा. बारीक किंवा उपम्याचा- कोणताही,एक वाटी दूध ,एक वाटी गोड दही ,एक ते दीड वाटी साखर ,अर्धी वाटी तूप किंवा लोणी ,अर्धा टीस्पून खायचा सोडा ,रंग, इसेन्स आवडीनुसार ,सुकामेवा

कृती : रवा हलका भाजून घ्या. उपम्याला लागतो तितका जास्त नाही, नीट गरम झाला, शेकला गेला की गॅस बंद करा.-दह्यात साखर घालून फेटून घ्या. आधी एक वाटी साखर घालून थोडं चाखून मग हवी तर अजून साखर घाला. दही गोड असेल आणि केकचा गोडवा बेताचाच हवा असेल तर एक वाटी साखर पुरेल.-दही नीट एकजीव झाल्यावर त्यात शेकलेला रवा, दूध, तूप, खायचा सोडा घालून नीट मिसळून अर्धा तास मिश्रण मुरवत ठेवा.-अर्ध्या तासाने रंग आणि इसेन्स घालणार असाल तर घाला. सुकामेवा केकमधे हवा तर मिश्रणात घाला.-नॉन स्टिक पॅनला तुपाचा हात लावून मिश्रण त्यात ओता आणि मंद आंचेवर पॅन ठेवा. झाकण ठेवा. मधे मधे झाकण काढून जमा झालेली वाफ जाऊ द्या.-खरपूस छान वास आला की केकमधे सुरी घालून बघा. सुरी कोरडी आली की केक तयार!



# आजचे राशिभविष्य

**मेष**
आर्थिक बाबी स्पष्ट करण्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने काम करावे लागेल. नवीन मालमत्ता खरेदी करण्यासाठी तुम्हाला धावपळ करावी लागेल.

**वृषभ**
व्यवसायात नवीन भागीदार फायदेशीर ठरतील. जमा बांडवलात वाढ होईल.कामाच्या ठिकाणी वरिष्ठ अधिकाऱ्यांशी अनावश्यक वाद होऊ शकतात.

**मिथुन**
व्यवसायात अनावश्यक अडथळ्यांमुळे तुम्ही अस्वस्थ व्हाल. आज बराच संघर्ष करावा लागेल. तुमच्या स्वतःच्या नवीन घरात जाऊ शकता.

**कर्क**
मालमत्तेशी संबंधित खरेदी-विक्रीसाठी तुम्हाला धावपळ करावी लागेल. महत्वाचं काम पूर्ण होईल. कोणतेही महत्त्वाचे काम उघड करू नका.

**सिंह**
तुमच्या भावनांना सकारात्मक दिशा द्या.तुमची दिनचर्या शिस्तबद्ध ठेवा. तुमच्या खाण्यापिण्याच्या सवयींवर नियंत्रण ठेवा.

**कन्या**
सहकाऱ्यांशी समन्वय साधण्याची गरज भासेल. कामाच्या ठिकाणी येणारे अडथळे कमी होतील. उत्पन्नाचे स्रोत वाढतील.

**तूळ**
काही महत्त्वाच्या कामात यश मिळाल्याने आर्थिक लाभ होतील. तुमच्या वडिलांकडून अपेक्षित आर्थिक मदत मिळेल. व्यवसायात उत्पन्न वाढ होईल.

**वृश्चिक**
चांगलं काम मिळेल. महत्त्वाच्या कामात येणारे अडथळे दूर होतील. बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या लोकांना बाहेरच्या देशात जावे लागू शकते.

**धनु**
तुम्ही तुमचा राग आणि कठोर शब्दांवर नियंत्रण ठेवावे. अन्यथा भांडणे गंभीर वळण घेऊ शकतात. तुम्हाला नोकरीच्या संधी मिळतील

**मकर**
आर्थिक स्थिती मजबूत असेल. पैशाच्या मदतीने काही महत्त्वाच्या कामातील अडथळे दूर होतील. यामुळे भविष्यात आर्थिक लाभ होतील.

**कुंभ**
काळजीपूर्वक विचार करून निर्णय घ्या.कामाच्या ठिकाणी चढ-उतार येतील.दिवस तुमच्यासाठी आनंददायी असेल. तुमचे आरोग्य चांगले राहील.

**मीन**
जास्त मेहनत करावी लागेल. अडकलेले पैसे मिळतील. नोकरीचा शोध पूर्ण होईल. आर्थिक स्थिती मजबूत असेल.




# आमदार सुलभाताई गायकवाड यांच्या हस्ते उंबर्डे , उसाटणे परिसरात वृक्षारोपण



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

राष्ट्रीय एकात्मिक वैद्यकीय संघटनातर्फे आयोजित "वृक्षारोपण कार्यक्रम" अमृत वन सायकल ट्रॅक, उंबर्डे येथे उत्साहात संपन्न झाला.

या उपक्रमात आमदार सुलभाताई गायकवाड यांच्या हस्ते रुद्राक्ष, अर्जुन, नागकेशर, वड, पिंपळ यासारख्या दुर्मीळ आणि औषधी झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. याच बरोबर एकूण ३० प्रकारची दुर्मीळ झाडे लावण्यात आली असून त्यांचे संगोपनाची जबाबदारी N.I.M.A. संस्थेने स्वीकारली आहे

या उपक्रमात संस्थेचे अध्यक्ष डॉ श्याम पोटदुखे, सचिव डॉ दीपक पोगाडे, खजिनदार डॉ ब्रिजेश सिंग, सदस्य डॉ निलेश कदम, वूमन फोरम अध्यक्षा डॉ सुनंदा जाधव, सचिव डॉ सोनाली चौधरी, खजिनदार डॉ मयुरी भेलोसे, सदस्या डॉ वर्षा कदम यांच्यासह अनेक निसर्गप्रेमींचा सक्रिय सहभाग प्रेरणादायी ठरला.

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून, भाजपा मलंगगड मंडळाच्या वतीने गुरुकृपा विद्यामंदिर, उसाटणे येथे देखील वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला.

**पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी झाडे लावा**

**जीवन वाचवा या संदेशासह विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण करण्याचा हा स्तुत्य उपक्रम ठरला.पर्यावरण वाचवण्यासाठी वृक्षारोपण हे पहिले पाऊल आहे. चला, आपणही निसर्गाच्या रक्षणासाठी एक झाड लावूया**

■ आमदार सुलभाताई गायकवाड

# समृद्धीच्या निमित्ताने राज्याच्या विकास दृष्टीकोनाला वेग

## आमदार निरंजन डावखरे यांची प्रतिक्रिया

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**इगतपूरी :** हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गाच्या अंतिम टप्प्याचे लोकार्पण इगतपुरी येथे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा. ना. श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते पार पडले. इगतपुरी ते आमणे असा हा अंतिम टप्पा आता प्रवाशांसाठी खुला झाला आहे. या ऐतिहासिक क्षणी महाराष्ट्राच्या विकासदृष्टीकोनाला अधिक वेग मिळाला आहे.

प्रसंगी राज्याचे उपमुख्यमंत्री मा. ना. श्री. एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री मा. ना. श्री. अजित पवार, शालेय शिक्षण मंत्री मा. ना. श्री. दादाजी भुसे, सार्वजनिक बांधकाम मंत्री मा.ना.श्री. शिवेंद्रराजे भोसले, अन्न व औषध प्रशासन मंत्री मा. ना. श्री. नरहरी झिरवळ, सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री मा. ना. श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर, खासदार मा. श्री. सुरेश म्हात्रे, मुरबाड चे आमदार मा. श्री. किसन कथोरे, विधानपरिषद आमदार मा. श्री. किशोर दराडे, आमदार मा. श्री. दौलत दरोडा, आमदार मा. श्री. शांताराम मोरे, आमदार मा. श्री. हिरामण खोसकर तसेच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे अधिकारी व विविध मान्यवरांची उपस्थिती लाभली.

समृद्ध महाराष्ट्राच्या दिशेने एक भव्य पाऊल पडले असून, हा महामार्ग केवळ रस्त्यांमधील अंतर कमी करणारा नाही तर महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाला चालना देणारा आणि नवी आर्थिक उर्जा निर्माण करणारा महत्त्वाचा मार्ग ठरणार आहे.



# मिरा भाईंदरमध्ये डिजिटल कचरा डब्बे

## पाकिकेकडून अकरा कोटीचा निधी मंजूर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भाईंदर :** मिरा भाईंदर शहरात रस्त्याच्याकडेला कचरा जमा करण्यासाठी डिजिटल यंत्रणा असलेले स्मार्ट डब्बे बसवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी जवळपास ११ कोटी रुपये खर्च करण्याचा प्रशासकीय ठराव मंजूर करण्यात आला आहे.

मिरा भाईंदर शहरातून दैनंदिन निघणारा कचरा उचलून तो उत्तन येथील घनकचरा प्रकल्पात नेला जातो. हे काम खासगी कंत्राटदाराच्या मदतीने केले जाते. सध्या शहरातील प्रभाग क्रमांक १, २, ३ मधील कचरा उचलण्यासाठी 'ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट' आणि प्रभाग क्रमांक ४, ५, ६ येथील कचरा गोळा करण्यासाठी 'कोणार्क' या दोन स्वतंत्र कंत्राटदारांची



निवड करण्यात आली आहे. त्यानुसार कचरा जमा करण्यासाठी महापालिकेकडून कचरा संकलन केंद्र उभारण्यात आले आहे. येथे मोठ्या कचऱ्याचे डब्बे उभारले असून, दिवसभर निघणारा कचरा येथे जमा केला जातो.

मात्र अनेकवेळा हे डब्बे लवकर भरत असल्याचे दिसून येतात. परिणामी, नागरिक आपला कचरा डब्ब्यात टाकण्याऐवजी त्याभोवती टाकून जातात. यामुळे दुर्गंधी पसरते आणि डासांची उत्पत्ती होते. तसेच रस्त्याच्या कडेला कचरा साचल्याने शहराची प्रतिमा देखील खराब होते. त्यामुळे यावर उपाय म्हणून शहरात डिजिटल यंत्रणांनी युक्त असलेले स्मार्ट डब्बे बसवण्याचा निर्णय महापालिकेकडून घेण्यात आला आहे. हे डब्बे भरताच त्याची माहिती स्वच्छता निरीक्षकांना मिळणार असून, ते लगेचच रिकामे करण्याची यंत्रणा प्रशासनाकडून उभारली जाणार आहे.

यासाठी जवळपास ११ कोटी रुपयांच्या खर्चास महापालिका आयुक्त राधा बिनोद शर्मा यांनी प्रशासकीय ठराव करून मंजुरी दिली आहे. तसेच याबाबतची निविदा देखील प्रशासनाने प्रसिद्ध केली असल्याचे महापालिकेने सांगितले आहे

# हंगामाआधीच बरसणाऱ्या मान्सूनचा शेत मशागतीला फटका

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उरण :** वेळेपूर्वीच सुरू झालेल्या पावसामुळे उरणच्या भातशेतीला फटका बसण्याची भीती व्यक्त केली जात आहे. यात मे महिन्यात करण्यात येणाऱ्या भाताच्या सुक्या पेरण्या वाया जाण्याची तसेच भात पीक लांबण्याची भीती शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे. मान्सूनची सुरुवात झाली आहे. त्यामुळे शेतकरी शेतीच्या मशागतीला लागला आहे. याच काळात शेतकरी भाताच्या सुक्या पेरण्या करतात. तप्त झालेली जमीन आणि त्यात पेरणी केलेले धान्य या उष्णत्यामुळे आणि त्यानंतर आलेल्या जोरदार पावसामुळे भाताचा अंकुर फुटण्यास मदत होते. मात्र यावेळी अगोदरच पावसाला सुरुवात झाली आहे. परिणामी पेरणी वाया जाण्याची तसेच पिकाचे प्रमाण कमी होण्याची शक्यता आहे.

औद्योगिकीकरण आणि शहरीकरण यामुळे येथील शेतीचे प्रमाण कमी झाले आहे. असे असले तरी उरणच्या अनेक भागात आजही भात शेती केली जाते. जवळपास २ हजार ४०० हेक्टर जमीनीवर भात पीक घेतले जात आहे. मात्र अवकाळी, अति पाऊस, नापिकी शेती आदी संकटे वारंवार येऊनही शेतकरी शेती करीत आहेत. मात्र या वर्षी मोठ्या प्रमाणात अवकाळीच्या सरी कोसळू लागल्याने शेतकरी धास्तावले आहेत. हवामान विभागाने मे महिन्याच्या अखेर पर्यंत अवकाळी पाऊस होण्याची शक्यता वर्तवली आहे. त्यामुळे यात भर पडली आहे. दरम्यान, वेळेपूर्वीच पावसाळा सुरू झाल्याने भात शेतीचा प्रश्न निर्माण झाला आहे. पेरण्याही थांबल्या आहेत. अशी माहिती उरणच्या तालुका कृषी अधिकारी अर्चना सुळ यांनी दिली आहे.

# नवी मुंबई मनपा शाळेतील शिक्षकांच्या लवकरच बदल्या

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई :** नवी मुंबई महापालिकेत शिक्षकांच्या बदल्या होणार असल्याचे संकेत पालिका शिक्षण उपायुक्तांनी दिले आहेत. पालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात हजारो विद्यार्थी शिक्षण घेत असून अनेक शिक्षक पालिकेच्या माध्यमिक व प्राथमिक विभागात एकाच शाळेत अनेक वर्षे काम करत असल्याने या शिक्षकांच्या बदल्या करण्यात येणार असल्याची माहिती पालिकेच्या शिक्षण विभागाने दिली आहे.

नवी मुंबई क्षेत्रात पालिकेच्या शाळेत विद्यार्थ्यांची संख्या खासगी शाळांपेक्षा अधिक आहे.

प्राथमिक शाळेतील शिक्षकांच्या बदल्या या पवित्र पोर्टलद्वारे केल्या जातात तर माध्यमिक विभागातील शिक्षकांच्या बदल्या पालिकेच्या शिक्षण विभागामार्फत केल्या जातात. नवी मुंबई महापालिकेतील मुख्याध्यापकांच्या बदल्या गतवर्षी करण्यात आल्या होत्या परंतु दुसरीकडे मागील अनेक वर्षापासून माध्यमिक विभागातील शिक्षकांच्या बदल्या झाल्या नाहीत. काही शाळांमध्ये शिक्षकांना १० वर्षांपेक्षा अधिक वर्षे एकाच शाळेत कार्यरत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे अनेक वर्षापासून एकाच शाळेत कार्यरत असलेल्या शिक्षकांच्या बदल्या होण्याची शक्यता पालिका शिक्षण विभागाने व्यक्त केली आहे.



# कुळगाव बदलापूर नगरपरिषदेत पर्यावरण रक्षणाची शपथ

**बदलापूर/दि.०४ :** पर्यावरण सप्ताहानिमित्त कुळगांव-बदलापूर नगरपरिषद सभागृहात पर्यावरण रक्षणाची शपथ घेण्यात आली व सिंगल यूज प्लास्टिकचा वापर टाळणे, झाडे लावणे, ऊर्जा आणि पाण्याचे संरक्षण, व स्वच्छतेसाठी कटिबद्ध राहण्याचा संकल्प केला. यावेळी मुख्याधिकारी मारूती गायकवाड यांच्यासमवेत नगरपरिषदेचे अधिकारी उपस्थित होते

# वसई विरार पालिका क्षेत्रात दरड प्रवण क्षेत्रात वाढ

## महापालिका सर्वेक्षणात ३३ ठिकाणे संवेदनशील

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वसई :** पावसाळ्यात होणाऱ्या अतिवृष्टीमुळे भूस्खलन व दरड कोसळण्याच्या घटना घडतात. अशा घटना रोखण्यासाठी वसई विरार महापालिकेने सर्वेक्षण करून दरड प्रवण क्षेत्र निश्चित केली आहेत. यावर्षी केलेल्या सर्वेक्षणात दरड प्रवण क्षेत्रात वाढ झाली असून शहरात ३३ ठिकाणे भूस्खलन व दरड प्रवण क्षेत्र घोषित करण्यात आली असून अशा ठिकाणांवर विशेष लक्ष केंद्रित केले आहे.

वसई विरार शहरातील बहुतांश भाग हा डोंगर परिसराचा आहे. या डोंगराच्या पायथ्याशी व डोंगरावर ही नागरिकांच्या वस्त्या आहेत. तर काही ठिकाणी डोंगर पोखरून अगदी डोंगराच्या जवळपास भूमाफियांनी चाळी उभारल्या आहेत. अशा ठिकाणी सुद्धा मोठ्या संख्येने नागरी वस्ती आहे. काही वेळा पावसाळ्यात अतिवृष्टीमुळे डोंगर भागातील माती पोकळ होऊन भूस्खलन होणे, दरड कोसळणे अशा घटना घडत असतात. यापूर्वी सुद्धा वसई पूर्वेच्या राजावळी वाघराळपाडा येथे दरड कोसळण्याची घटना घडली होती. पावसाळ्यात अशा घटना घडू नये यासाठी महापालिका सज्ज झाली आहे.

### अशी आहेत दरड प्रवण क्षेत्र

**मोरेगाव डोंगर नालासोपारा (पूर्व), कारगिल नगर टेपाचा पाडा. जिवदानी पाडा, आण्णा पाडा, राक्षसी पाडा, साईनाथ झोपडपट्टी, वैष्णव जिवदानी कॉम्प्लेक्स विरार पूर्व, जोसना अपार्टमेंट साईनाथ नगर, वनोठा पाडा, आचोळे डोंगरी, पडखळ पाडा, तुळींज सेवालाल नगर, निळेगांव, डोंगरी, नालासोपारा (प), संतोषभवन, शिर्डीनगर, कानुपाडा, वालईपाडा, पाच आंबा, आझाद नगर, विष्णु नगर, शांतीनगर नवजिवन, गडगापाडा, धानिव, शिरसाड, इंदिरानगर वसाहत, बिलालपाडा, अलंगपाडा, सातीवली खिंड, गोखिवरे भागपाडा, गोखिवरे, बंजार पाडा भोयदापाडा, सातीवली डोंगरी, राजावळी, वाघरालपाडा, जानकीपाडा, गोखिवरे अशा ३३ ठिकाणे पालिकेने दरड प्रवण क्षेत्र म्हणून घोषित केली आहेत. यातील सर्वाधिक दरड प्रवण क्षेत्र ही पेल्हार आणि वालीव या दोन प्रभाग समिती कार्यक्षेत्रात येत आहे.**

# भिवंडी निजामपूर महापालिकेच्यावतीने विविध प्रभागांत वृक्षरोपण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधुन भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या उद्यान/वृक्षप्राधिकरण विभागामार्फत महानगरपालिकेच्या प्रभाग समिती क्र. 1 कार्यक्षेत्रातील अजवा हॉटेलच्या मागे, मिल्लत नगर रोड लगत नव्याने विकसीत होणाऱ्या उद्यानांत मा. अति-आयुक्त श्री. विठ्ठल डाके यांच्या शुभहस्ते तसेच मा. श्री. इमरान वली मोह. खान, माजी उपमहापौर, भिवंडी मनपा व मा. उपआयुक्त (उद्यान) श्री. बाळकृष्ण क्षिरसागर, मा. सहायक आयुक्त (आरोग्य) श्री. शैलेश दोंदे, मा. सहाय्यक आयुक्त, श्री. नितीन पाटील, मा. सहाय्यक आयुक्त (सा.प्र.) श्री. अजित महाडीक, मा. सहाय्यक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. 1 श्री. मकसुम शेख, श्री. वसिम शेख, उपअभियंता, मा. श्री. फैजल तातली, आरोग्य विभाग, श्रीकांत परदेशी, जनसंपर्क अधिकारी, भिवंडी मनपा व परिसरातील सामाजिक कार्यकर्ते, आगाज महिला बचत गटाच्या महिला व मनपाचे अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थित वृक्षरोपणांचा शुभारंभ कार्यक्रम करण्यात आला.

सदर कार्यक्रमांतर्गत प्रभाग समिती क्र. 1 कार्यक्षेत्रातील अजवा हॉटेलच्या मागे, मिल्लत नगर रोड लगत नव्याने विकसीत होणाऱ्या उद्यानांत कांचन, बहावा, अर्जन, जांभुळ, आंबा, बकुळ, रक्तचंदन इ. स्थानिक प्रजातीची-200 वृक्षरोपांची लागवड करण्यात आली असून, भादवड स्मशानभुमी आवरात उपलब्ध जागी मा. प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. 2 यांच्या शुभहस्ते व मनपाचे अधिकारी व कर्मचारी तसेच परिसरातील वृक्षप्रेमी नागरीक यांच्या उपस्थितीत 200 बांबू वृक्षरोपांचे लागवड करण्यात आले असून, लागवड करण्यात आलेल्या वृक्षरोपांचे महानगरपालिकेमार्फत जतन व संवर्धन करण्यात येणार आहे.

प्रभाग समिती क्र. 3 कार्यक्षेत्रातील वऱ्हाळा तलाव उद्यान परिसरामध्ये महिला बचत गट यांच्या उपस्थितीत 100 झाडांची वृक्षरोपण करण्यात आलेली असून, प्रभाग समिती क्र. 4 कार्यालयासमोर उपलब्ध जागी मा. उपआयुक्त (मुख्या) श्री. विक्रम दराडे, मा. सहायक आयुक्त (आरोग्य) श्री. शैलेश दोंदे यांच्या शुभहस्ते 100 स्थानिक प्रजातीच्या झाडांची वृक्षरोपण करण्यात आलेले असून, मनपाच्या दिवानशहा दर्गा तलाव परिसरात गरीब नवाज फॉऊडेश यांच्या उपस्थितीत स्थानिक प्रजातीची 200 झाडांचे वृक्षरोपण करण्यात आले आहे.

# कल्याण पूर्वच्या माणेरे गावातील अतिक्रमणे जमीनदोस्त

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण पूर्वेतील माणेरे गावात दोन वर्षांपासून अतिक्रमणांमुळे एका वर्दळीच्या रस्त्याचे काम रखडले होते. या वर्दळीच्या रस्त्यांमधील अतिक्रमणे माणेरे गावातील ग्रामस्थांना विश्वासात घेऊन आय प्रभागाचे साहाय्यक आयुक्त भारत पवार यांनी जमीनदोस्त केली. यामुळे दोन वर्षापासून रखडलेल्या या रस्त्यावरील रूंदीकरण आणि गटाराची कामे तातडीने सुरू करण्यात आली.

गावातील गटाराची हद्द, रस्त्यांमधील अतिक्रमणे या विषयावरून काही ग्रामस्थ गावातील रस्ता रुंदीकरणाला विरोध करत होती. एक महत्वाचा रस्ता अतिक्रमणांमुळे पूर्ण होत नसल्याने माणेरे गावातील काही ग्रामस्थ नाराजी व्यक्त करत होते. आय प्रभागाचे साहाय्यक आयुक्त भारत पवार यांनी अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे, उपायुक्त अवधूत तावडे यांच्या मार्गदर्शनाखाली संबंधितांना नोटिसा देऊन रस्त्यामधील अतिक्रमणे हटविण्याचे आदेश दिले. दोन दिवसापूर्वी माणेरे गावात अचानक जेसीबीसह पालिकेचे तोडकाम पथक दाखल झाले. रस्ते मार्गात अडसर ठरणारी सर्व बेकायदा अतिक्रमणे हटविण्यास सुरूवात केली.

या अतिक्रमणांमुळे या भागात गटाराची व्यवस्था पालिकेला करता येत नव्हती. दरवर्षी पावसाळ्यात माणेरे गावातील कृष्णानगरी चाळ भागात पावसाचे पाणी शिरत होते. आयुक्तांनी कोणत्याही नागरी वस्तीत पावसाचे पाणी तुंबणार नाही याची खबरदारी घेण्याचे आदेश प्रभाग साहाय्यक आयुक्तांना दिले आहेत. या आदेशाप्रमाणे साहाय्यक आयुक्त पवार यांनी पोलीस बंदोबस्तात माणेरे गावातील रस्ता रुंदीकरणाला अडथळा ठरणारे ११ गाळे, दुकाने, घरांसमोरील निवारे, ओटे तोडण्याची कारवाई केली. सुरूवातीला ग्रामस्थांनी कारवाईला कडाडून विरोध केला. गावात तणावाचे वातावरण निर्माण झाले. या तणावाकडे लक्ष न देताच साहाय्यक आयुक्त पवार यांनी तोडकाम पथकाच्या साहाय्याने आपली कारवाई उरकून घेतली. याठिकाणी भूमिगत असलेले जुने गटार शोधून ते मुख्य नाल्याशी जोडून पावसाचे पाणी रस्त्यावर न तुंबता वाहून जाईल अशी व्यवस्था करण्यात आली.

# गीतकार प्रा. डॉ. विनायक पवार यांना शाहीर दादा कोंडके स्मृती गौरव पुरस्कार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

जालना जिल्ह्याचे भुमिपूत्र तथा प्रसिद्ध गीतकार प्रा. डॉ. विनायक पवार यांना शाहीर दादा कोंडके स्मृती गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

महाराष्ट्र सांस्कृतिक अभियान न्यासाच्या वतीने मुंबईतील शाहीर अण्णा भाऊ साठे नाट्यगृहात रविवारी ( दि. 1) आयोजित लोकरंग महोत्सवात खासदार अरविंद सावंत यांच्या हस्ते प्रा. डॉ. विनायक पवार यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी त्यांचे वडील हाबू पवार तसेच शाहीर दादा कोंडके यांचे भाचे पद्माकर मोरे, भाची सून माणिकताई मोरे, शाहीर दादा कोंडके यांचे नातू अॅड. अनिरुद्ध मोरे, महाराष्ट्र सांस्कृतिक अभियान न्यासाच्या प्रकल्प संचालिका दीपमाला लादे आदींची प्रमुख उपस्थिती होती.



जालना जिल्ह्यातील बदनापूर तालुक्यातील बावणे पांगरी येथील रहिवासी असलेले प्रा.डॉ. विनायक पवार हे रायगड जिल्ह्यातील पेण येथील डॉ.पतंगराव कदम कला व वाणिज्य महाविद्यालय पेण जि. रायगड येथे मराठी विषयाचे प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी सासवड व उस्मानाबाद येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात आमंत्रित कवी म्हणून सहभाग नोंदविला आहे. राष्ट्रीय पुरस्कार विजेता मराठी चित्रपट ख्वाडा तसेच बबन , छत्रपती शासन, लँड 1857, राजकुमार , फतवा, रुंदी, चौक, टीडीएस, रघु 350,नाद द हार्ड लव या चित्रपटांचे गीतलेखन केले आहे.प्रा.डॉ.पवार यांनी रौंदळ या मराठी चित्रपटांसाठी संवाद लेखन व भूमिकाही केली आहे.याशिवाय नाद द हार्ड लव्ह हा चित्रपटाची पटकथा, संवाद आणि गीतेही त्यांनी लिहिली आहेत. चिवटी , ग्लोबल आडगाव , विरजण, गोवर्धन,उत, महाराष्ट्र फाईल्स, कलावती, दुनियादारी 2, येरे येरे पैसा 3, रुबाब आदी आगामी चित्रपटासाठी त्यांनी गीत लेखनही त्यांनी केले आहे.

प्रा. डॉ. विनायक पवार यांच्या नामुष्कीचे पिढीजात वर्तमान या काव्यसंग्रहाला आतापर्यंत लोक कवी विठ्ठल वाघ, विशाखा, गदिमा,एकता फाउंडेशन पुरस्कारासह एकून आठ पुरस्कार मिळाले आहेत.नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात बी.ए. च्या अभ्यासक्रमात त्यांच्या गीतलेखन या विषयावरील लेखाचा समावेश आहे. कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाच्या बी.ए. च्या अभ्यासक्रमात पटकथा , संवाद या विषयावरील लेखाचा समावेश आहे.डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील बी. ए च्या अभ्यासक्रमात त्यांच्या एक व एम. ए. हिंदी विषयाच्या अभ्यासक्रमात दोन कवितांचा समावेश आहे. याशिवाय अमरावती येथील संत गाडगेबाबा विद्यापीठात त्यांच्या दोन कवितांचा समावेश असून मुंबई विद्यापीठाच्या बी. ए. भाग एक अनिवार्य मराठी अभ्यासक्रमात एका कवितेचा समावेश आहे. इयत्ता 10 वीच्या मराठी अभ्यासक्रमात माणसं पेरायला लागू या अनुवादित कवितेचा समावेश आहे.





# रनर्स क्लॅन फाउंडेशनच्या धावपटूंची कॉमरेडकडे झेप

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण : रनर्स क्लॅन फाउंडेशन, डोंबिवली हि एक अग्रगण्य सामाजिक संस्था आहे. हि संस्था गेल्या ५ वर्षांपासून धावपटूंना विनामुल्य प्रशिक्षण देऊन राष्ट्रीय पातळीवरचे धावपटू घडवत आहे. आजपर्यंत संस्थेच्या या उपक्रमातून अनेक धावपटु तयार झालेले आहेत. त्यापैकी वाशिंद शहराचे नगरसेवक आणि आरसीएफचे उत्कृष्ट धावपटु संदिप पाटील हे दि. ८ जून रोजी दक्षिण आफ्रिका येथे होणाऱ्या ९० किमी. कॉमरेड रेससाठी रवाना झालेले आहेत. तसेच दि. १४ सप्टेंबर २०२५ रोजी लेह लडाख येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय मॅरेथॉन साठी आरसीएफचे दुसरे पथक रवाना होणार आहे. त्यामध्ये शिल्पा छेडडा, गिरीश लोखंडे आणि विजय सकपाळ हे अव्वल दर्जाचे धावपटु सहभागी होणार आहेत. या सर्व धावपटुंना प्रोत्साहन देण्यासाठी संस्थेने रविवार दि. १ जून रोजी सावळाराम क्रिडासंकुल येथे एक कार्यक्रम आयोजित केला होता. त्यावेळी कल्याण डोंबिवलीचे नामंकीत धावपटु, आरसीएफचे सर्व पदाधिकारी आणि सर्व सदस्य धावपटु सह-परिवार उपस्थित होते. या सर्व धावपटुंना त्याच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्रासाठी एकत्र या

## – प्रमोद वाघमोडे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
ठाणे : धनगर समाजाचा सर्वांगीण विकास व शासनाच्या सर्व योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असलेले अनुसूचित जमातीचे (Scheduled Tribe) प्रमाणपत्र आजही समाजाला मिळालेले नाही. हा हक्क प्राप्त करण्यासाठी आता निर्णायक लढ्याची गरज असून, तो फक्त न्यायालयीन मार्गाने शक्य आहे. असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य महाराणी अहिल्यादेवी होळकर समाज प्रबोधन मंच, कोकण विभागीय सचिव प्रमोद वाघमोडे यांनी केले.

1956 पूर्वी व नंतरही "Dhangad" नावाची कोणतीही जात अथवा जमात राज्यात अस्तित्वात नसल्याचे सरकार दरबारी व न्यायालयीन निर्णयांतून स्पष्ट झालेले आहे. त्यामुळे धनगर समाजाने आपला हक्क मिळवण्यासाठी न्यायालयात सक्षमपणे उभं राहण्याची हीच योग्य वेळ आहे. आपण जर स्वस्थ बसलो तर काहीही हातात येणार नाही. आता सर्व मतभेद, हेवेदावे बाजूला सारून एकवटण्याची वेळ आली आहे. अहिल्यादेवी मातेचे वंशज म्हणून आपल्याला संघर्षाची मशाल पुन्हा पेटवावी लागेल. रस्त्यावरचे आंदोलन आणि कायदेशीर लढाई या दोन्ही बाजूंनी आपण ताकदीने लढलो तर शंभर टक्के यश निश्चित आहे. असेही वाघमोडे यांनी ठामपणे सांगितले.

महाराणी अहिल्यादेवी होळकर समाज प्रबोधन मंचच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रातील समाज बांधवांना आवाहन करण्यात येत आहे की आपापले व्यक्तिगत भेद विसरून, हक्काच्या या लढ्याकरिता एकत्र यावे. ही लढाई सामाजिक, कायदेशीर आणि वैचारिक पातळीवर एकजुटीने लढल्यास आपले मूलभूत हक्क मिळवणे शक्य होईल.

# पर्यावरणाचा बचाव करण्यासाठी नागरिकांचे सहकार्य मोलाचे

## – केडीएमसी आयुक्त अभिनव गोयल

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण : पर्यावरणाचा बचाव करण्यासाठी, प्रदूषण कमी करण्यासाठी, जलसंवर्धनासाठी तसेच कचरा वर्गीकरणासाठी नागरिकांनी देखील पुढाकार घेऊन सहकार्य करावे असे प्रतिपादन कल्याण डोंबिवली महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी आज केले. जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून आज कल्याण मधील उंबर्डे अमृत प्रकल्प येथे वृक्षारोपण करताना त्यांनी हे प्रतिपादन केले. याचवेळी त्यांनी उंबर्डे येथील घनकचरा प्रकल्प येथे मीयावाकी पद्धतीने वृक्षारोपण करण्याचा शुभारंभ केला. महापालिका परीक्षेत्रात अन्य सहा ठिकाणी देखील अशी मियावाकी जंगले तयार केली जातील अशी माहिती आयुक्त अभिनव गोयल यांनी दिली.



### जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून सुमारे तीन हजार झाडांची लागवड



आज देशी प्रजातीच्या सुमारे 3 हजार झाडांची आपण लागवड केली आहे, यापुढे लोकसहभागातून वृक्षारोपण केले जाईल ,त्याचप्रमाणे "एक विद्यार्थी एक झाड "ही संकल्पना-ही ॲक्टिव्हिटी दर महिन्यात राबविण्यात येईल अशी माहिती त्यांनी यावेळी दिली. शासनाच्या निर्देशानुसार प्लास्टिक मुक्त शहर हे अभियानही आपल्याला सर्वांच्या वतीने राबवायचे आहे असेही आवाहन आयुक्त यांनी यावेळी केले. या वृक्षारोपण अभियानात आमदार सुलभा गायकवाड तसेच विविध संस्थांचे प्रतिनिधी, एमएमआरडीएचे अधीक्षक अभियंता, मुख्य उद्यान अधीक्षक संजय जाधव, महापालिकेचे ब्रँड अँबेसिडर डॉ. प्रशांत पाटील, उद्यान अधीक्षक अनिल तामोरे यांच्यासह इतर अधिकारी वर्ग, विद्यार्थी यांनी अतिशय उत्साहात सहभाग घेतला. तदनंतर जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून महापालिकेच्या आचार्य अत्रे रंगमंदिरातील कॉन्फरन्स हॉलमध्ये सर्व अधिकारी वर्गाच्या वतीने पर्यावरणाची शपथ घेण्यात आली.




# कर्जाच्या बहाण्याने ऑनलाईन फसवणूक

## उल्हासनगरमधील घटना

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
उल्हासनगर : १३ लाख रुपयांचे वैयक्तिक लोन काढुन देतो असे खोटे अमिष दाखवुन भामट्याने एका वयोवृद्ध महीलेला ४५ हजार रुपयाला चुना लावल्याची खळबळजनक घटना काल बदलापुर पुर्व पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलीय. पोलीस त्या भामट्याचा शोध घेत आहेत.



बदलापुर पुर्व पोलीस ठाण्याच्या हद्दीतील रु.नंबर ३०१,गंगोत्री अर्पार्मेन्ट,चैतन्य संकुल, कात्रप बदलापुर पुर्व येथे जमुना बबन बनसोडे (५२) हया आपल्या परीवारासह राहतात. त्याच्या ओळखीचे गौरव मयेकर,विजय म्हात्रे,या दोघांनी मिळून त्यांना फोनवर संर्पक साधुन आम्ही तुम्हाला १३ लाख रुपयांचे वैयक्तिक लोन काढुन देतो असे बोलून लोन प्रोसेस करण्यासाठी गुगलवर ४५ हजार रुपये पाठवा. जमुना बनसोडे यांनी त्या भामट्यांच्या बोलण्यावर विश्वास ठेऊन त्यांच्या गुगलपे वर पैसे पाठवले. आपली फसवणूक झाली असल्याचे बनसोडे यांच्या लक्षात येताच त्यांनी त्या भामट्याच्या विरोधात बदलापुर पुर्व पोलीस ठाण्यात जाऊन लेखी तक्रार दिल्यावर पोलिसांनी त्या भामट्याच्या विरोधात पोलीस ठाण्यात गुन्हा रजी.नंबर १/३४१/२०२५ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३१८(४), ३(५) प्रमाणे गुंन्हा दाखल करण्यात आला असुन या प्रकरणाचा पुढील तपास बदलापुर पुर्व पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अनुकूल दोंदे हे करत आहेत.

# कै. अण्णा कूर्मा चौधरी यांच्या सातव्या पुण्यस्मरणानिमित्त विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
कल्याण : कै. अण्णा कूर्मा चौधरी यांच्या सातव्या पुण्यस्मरणानिमित्त पवन चौधरी, सौरभ चौधरी, विकी चौधरी आणि एम्पेरर्स ग्रुप यांच्या वतीने विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. गेल्या सहा वर्षांपासून हे उपक्रम नियमितपणे राबवले जात असून यंदाचे हे सातवे वर्ष होते.




यावर्षी आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात सुमारे ४० रक्तदात्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. या उपक्रमातून गरजू रुग्णांसाठी महत्त्वपूर्ण मदत मिळाली आहे. शाळकरी विद्यार्थ्यांसाठी मोफत वह्यांचे वाटप देखील करण्यात आले. यामध्ये सुमारे ४५० ते ५०० विद्यार्थ्यांना शालेय वह्यांचे वितरण करण्यात आले, जे विद्यार्थ्यांसाठी मोठा आधार ठरले. मोफत नेत्र तपासणी शिबिराला देखील नागरिकांचा चांगला प्रतिसाद लाभला. अनेक नागरिकांनी नेत्र तपासणी करून घेतली आणि त्याच्या आरोग्यविषयक मार्गदर्शनाचा लाभ घेतला. या उपक्रमांचे उपस्थित नागरिकांनी आणि भागीदारांनी विशेष कौतुक केले.

समाजाच्या हितासाठी अशा उपक्रमांचे आयोजन भविष्यातही करण्यात यावे, अशी अपेक्षा अनेकांनी व्यक्त केली. यावेळी माजी नगरसेवक जनार्दन म्हात्रे, ऐड. प्रदीप बावस्कर, मनसे पदाधिकारी संदीप म्हात्रे, अजय शेट्टी अतुल अंबरे, प्रेम पाटील, अनिल पाटिल, रूपेश पाटिल, माजी नगरसेवक सोपान पाटिल, अंकित जाधव, आकाश शिंदे, अभी पाटील, किशन चौरसिया, सूरज शिंदे, आकाश पत्रों, रोहित शिंदे आणि मित्र परीवार उपस्थित होते.

# अंबरनाथकरांनो एक तरी झाड लावा

## – उमाकांत गायकवाड

### पर्यावरण दिनी अंबरनाथकरांना आवाहन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
उल्हासनगर : जागतिक पर्यावरण दिनानिमित्त जगभरात निसर्ग आणि पृथ्वीतलावरील पर्यावरणाच्या संरक्षण आणि संवर्धनाकरिता जनजागृती व्हावी या निमित्ताने विविध उपक्रम राबवले जात आहेत. अंबरनाथ नगरपरिषदेच्या वतीने अधिकारी कर्मचारी यांच्या हस्ते मदानसिंग उद्यानात वृक्षारोपण करण्यात आले . यामुळे समाजात पर्यावरण संवर्धनाविषयी जनजागृतीचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात मुख्याधिकारी उमाकांत गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आली. यानंतर विविध ओसाड जागांवर रोपं लावण्यात आली. पर्यावरण विभाग प्रमुख नवनीत देवरे, उद्यान अधीक्षक जितेंद्र केदार, जनसंपर्क अधिकारी किमया पवार, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी, स्वयंसेवी संस्था आणि स्थानिक नागरिक सहभागी झाले होते.



या उपक्रमात सुमारे २०० झाडे लावण्यात येणार असून, यामध्ये फळझाडे, फुलझाडे आणि स्थानिक हवामानास अनुरूप असलेली झाडे प्राधान्याने निवडण्यात आली आहेत. शिरीष, करंज, फणस, कांचन, कदंब, मोहोग, तामण, बिट्टी , गुलमोहर इ. झाडांचा समावेश होता.

पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपण आवश्यक असून, ही केवळ एक दिवसीय क्रिया न राहता दीर्घकालीन काळजी घ्यावी लागेल. अंबरनाथ शहर हिरवेगार व्हावे यासाठी नगर परिषदेसोबत शहर वासीयांना कटिबद्ध आहे. नागरिकांना एक झाड लावा आणि त्याचे पालनपोषण करा असा संदेश यावेळी मुख्याधिकारी उमाकांत गायकवाड यांनी केले.




# भिवंडी महानगरपालिकेची करवाढ : नागरिक संतप्त

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
भिवंडी : भिवंडी महानगर पालिकेने नुकताच जललाभ कर आणि मलभार कर या दोन करामध्ये लक्षणीय वाढ केल्याने शहरातील नागरिकां मध्ये तीव्र नाराजी व संतापाची लाट उसळली आहे.शासन आदेशानुसार नियोजनात्मक नागरी सुविधा देण्यात अपयशी ठरलेल्या महापालिकेने करवाढ करून करदात्या नागरिकांचे जखमेवर मीठ चोळण्याचे काम केले आहे. त्यामुळे ही जाचक करवाढ तातडीने रद्द करण्यात यावी अशी मागणी होत आहे.

भिवंडी महानगरपालिका क्षेत्रात अनेक ठिकाणच्या नागरिकांना मुबलक व शुद्ध पाण्याचा पुरवठा कायदेशीर दाबाने होत नाही.इमारत व तळमजल्यावर तसेच चाळीत राहणाऱ्या रहिवासी नागरिकांन



पाणी मिळविण्यासाठी विजेची मशीन लावावी लागते.तर अनेक ठिकाणी नियमित पाणी पुरवठा होत नाही.महानगरपालिका क्षेत्रात राहणाऱ्या नागरिकांच्या प्रत्येक सदनिका धारकाकडून मालमत्ता करासोबत जलकर घेतला जात आहे. अनेक ठिकाणी नियमित व सरकारी वेळेनुसार पिण्याचे शुद्ध पाणी मिळत नाही त्यामुळे नागरिकांनी मनपा आयुक्त व शासन, पोलिसांकडे तक्रारी करत आहेत. त्याचप्रमाणे ड्रेनेज बाबत वारंवार तक्रार करून देखील ड्रेनेज प्रवाह आणि चेम्बरची दुरुस्ती केली जात नाही.केंद्र आणि राज्य शासनाकडून मिळालेल्या निधीचा विनिउपयोग होत नसल्याने नागरिकांना विविध समस्यांचा सामना करावा लागत आहे. शहरातील नागरिकांना योग्य दाबाने पाणी मिळावे यासाठी पाण्याच्या टाक्यांचे बांधकाम करण्यात आले. मात्र या टाक्यांमधून नागरिकांना पाणी नियमित वितरित केले जात नसल्याने नागरिकांना पाणी टंचाई सामना करावा लागत आहे.

भिवंडी महापालिकेचे माजी आयुक्त अजय वैद्य यांनी ११-२-२५ रोजी घेतलेल्या ठराव क्र. ७४३ नुसार पाणीपुरवठा विभागाच्या सूचनेने सध्याच्या प्रशासनाने अलीकडेन जल लाभ कर (Water Benefit Tax) आणि मल लाभ कर (Sewerage Benefit Tax) २०२४-२५ या आर्थिक वर्षांपासून लागू केला आहे.त्यानुसार सन २०२४-२५ या आर्थिक वर्षांपासून कारयोग्य मूल्याच्या निवासी वापराकरिता १० टक्के व अनिवासी वापराकरिता १५ टक्के जल लाभ कर आकारण्यात आला आहे.तर सर्वप्रकारच्या मालमत्ताना सरसकट ८ टक्के मालमत्ता कर आकारण्यात येणार आहे. मालमत्ताधारकांना कर दरवाढ संदर्भात कोणत्याही प्रकारची माहिती व दवंडी देखील दिली नाही तसेच हरकती देखील मागविल्या नाही. त्यामुळे .नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. महापालिका कार्यक्षेत्रात.अनेक मालमत्ताधारक मालमत्ता कर भरत नाही.त्यामुळे हा वाढलेल्या मालमत्ता कराचा भुर्दंड नियमित कर भरणाऱ्या मालमत्ता धारकांना सहन करावा लागणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

भिवंडीत जल आणि मल प्रवाहासाठी विविध योजना राबविल्या आहेत. त्या कार्यान्वित होणार आहेत. त्या योजनेनुसार चालणाऱ्या कामकाजासाठी नियमित येणारा खर्च आणि या योजना अद्यावत ठेवण्यासाठी लागणारा खर्च मोठा असून त्यासाठी हि दरवाढ करणे अपेक्षित आहे अशी माहिती आहे.
- संदीप पटनावर,प्र.कार्यकारी अभियंता,भिवंडी मनपा.

नाही.तसेच मलनिःस्सारणासाठी भुयारी गटारांची योजना राबविली मात्र ही योजना अद्याप अर्धवट स्थितीत पडून आहे. भिवंडी महानगर पालिका आयुक्त प्रशासनाने नागरी सुविधांची नागरिकांना केवळ स्वप्ने दाखविली. मात्र प्रत्यक्षात नागरिकांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे.

# गोग्रीनरेवलूशन मोहिमेअंतर्गत वृक्षारोपण




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
ठाणे : पर्यावरणाविषयी जनजागृती निर्माण करण्यासाठी आणि भावी पिढ्यांसाठी हरित व निरोगी भवितव्य घडविण्यासाठी व पर्यावरण संरक्षणाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत गोग्रीनरेवलूशन मोहिमेअंतर्गत इंडो काउंट फाउंडेशन आणि इसिक हॉस्पिटल यांच्या संयुक्त सहकार्याने इसिक हॉस्पिटल ठाणे येथे दि.02 जून 2025 रोजी वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यामध्ये प्रमुखतः शीशम, जांभूळ आणि करंज यांसारख्या पर्यावरणपूरक जातींच्या ६० झाडांची लागवड करण्यात आली.

यावेळी संस्थापक ॲड. विनय कुमार सिंह, ESIC हॉस्पिटलचे अधीक्षक डॉ. मुगलिकर, इंडो काउंट फाउंडेशनचे कुमुद गोस्वामी आणि समीर भीवापुरकर यांची विशेष उपस्थित होते. या प्रेरणादायी उपक्रमात गोग्रीनरेवलूशन टीमनेचे लक्ष्मी मौर्या, ॲड. शिक्षा संस्कार, रणजीत सिंह, गोपाल ठाकुर, आशीष सिंह, सूरज राजभर, सोनू मल्लाह आणि हर्ष सिंह यांनी सक्रिय सहभाग नोंदवला. सर्व सदस्यांनी केवळ झाडे लावली नाहीत, तर त्या झाडांचे संगोपन करण्याची जबाबदारीही घेतली.




# भिवंडीत संशयास्पद जन्म नोंदी : किरीट सोमय्यांची तपासणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
भिवंडी : भिवंडी तालुक्यातील पडघा गावाजवळील बोरिवली येथे ठाणे ग्रामीण व मुंबई एटीएस पोलीस पथकाने केलेल्या कारवाई मुळे संपूर्ण राज्यात खळबळ माजली आहे. या पार्श्वभूमीवर भाजपा नेते माजी खासदार किरीट सोमय्या यांनी आज गुरुवारी तालुक्यातील बोरिवली व पडघा ग्रामपंचायत कार्यालयास भेट देत तेथील जन्म नोंदीच्या कागदपत्रांची तपासणी केली आहे.यावेळी त्यांच्या सोबत भाजपा ग्रामीण जिल्हाध्यक्ष जितेंद्र डाकी,गटविकास अधिकारी गोविंद खामकर,नायब तहसीलदार आदेश म्हात्रे,पोलिस उपअधीक्षक राहुल झालटे,पडघा पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक बाळा कुंभार,बोरिवली सरपंच अन्वर पिंजरी,पडघा सरपंच रवींद्र विशे यांच्यासह मोठ्या संख्येने अधिकारी उपस्थित होते.



महाराष्ट्रात जन्म मृत्यू नोंदी मध्ये फार मोठा घोटाळा झाला आहे. मागील चार महिने याबाबत शोध घेत आहे.२०२४ मध्ये राज्यात २ लाख लोकांनी खोटे कागदपत्र देऊन जन्म नोंदी साठी अर्ज केले.त्या सर्वांच्या नोंदी तपासण्याचे आदेश राज्य सरकारने दिले आहेत.पडघा परिसरातील अर्धा डझन गावां संदर्भात काही संशयास्पद जन्म नोंदी केल्याची मला माहिती मिळाली आहे अशी माहिती देत मालेगाव येथे तर १०४४ अशा पद्धतीने जन्म प्रमाणपत्र घेतले आहे.त्यातील २१७ गायब आहेत.त्यामुळे आंतरिक सुरक्षा धोक्यात येत आहे.जन्म प्रमाणपत्र घेतले की लगेच दुसऱ्या दिवशी पासपोर्ट साठी अर्ज ,चौथ्या दिवशी लगेच पासपोर्ट मिळाले की परदेशात रवाना होत आहेत.अशा गावात मी प्रत्यक्ष भेटी देऊन मी चौकशी करणार असल्याचे किरीट सोमय्या यांनी सांगितले. संपूर्ण महाराष्ट्रातील संशयास्पद जन्म मृत्यू नोंदणी बाबत भाजपा नेते माजी खासदार किरीट सोमय्या हे महाराष्ट्रातील विविध पालिका कार्यालय ,तहसीलदार कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय या ठिकाणी भेटी देऊन कागदपत्रांची पडताळणी करीत आहेत. आज भिवंडी तालुक्यातील बोरीवली व पडघा ग्रामपंचायत कार्यालयास भेट देऊन तेथील जन्मृत्यू नोंद कागदपत्रांची पडताळणी केली आहे.त्या सोबतच वाडा तालुक्यातील कुडूस, वडवली व भिवंडी तालुक्यातील अंबाडी या गावांना सुद्धा भेटी दिल्या आहेत. बोरीवली येथील एटीएम च्या कारवाईनंतर हा भेटीचा दौरा असल्याने पोलिसांनी विशेष बंदोबस्त ठेवला होता.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024